# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२३**

**सन २०२३-२४ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**मंगळवार, दिनांक १२ डिसेंबर, २०२३**

## इतर मागास बहुजन कल्याण विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ६**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: झेडजी-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२२५, अनुसूचीत जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण**<br>**बाब क्रमांक: ४७८, रूपये:- ३,६०,१२,५९,०००/-**<br>**श्री. बाळासाहेब थोरात** |
| (१) | ६१९६ | १०० | नव्याने स्थापन झालेल्या इतर मागास बहुजन कल्याण विभागासाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यासाठी पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध नसणे, इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग यांच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकासासाठी अस्तित्वात असलेल्या विविध योजना सामाजिक न्याय विभागामार्फत राबविण्यात येणे, उक्त योजना राबविताना येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन दि. ९ मार्च २०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार इतर मागास बहुजन कल्याण हा स्वतंत्र विभाग निर्माण करुन त्यासाठी ८९ पदे नव्याने निर्माण करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता देणे, सन २०१८ मध्ये ओबीसी कल्याण विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार सदर विभाग कार्यक्षमपणे चालावा म्हणून क्षेत्रीय स्तरावर एकूण ७० पदे,जिल्हा स्तरावर ३६ सहाय्यक संचालकांची पदे आणि इतर अधिकारी व कर्मचारी मिळून एकूण ३७० पदे सामाजिक न्याय विभागाकडून वर्ग करण्यासाठी मान्यता दिलेली असताना तसेच वेळोवेळी मागणी करुनही सदर पदे ओबीसी कल्याण विभागाकडे वर्ग करण्यात होत असलेली चालढकल,सद्य:स्थितीत ओबीसी मंत्रालयाचे केवळ पाचच अधिकारी ४००० कोटींचा विभाग मंत्रालयीन स्तरावरच चालवत असल्यामुळे या समाजावर होत असलेला अन्याय, क्षेत्रीय स्तरावर वर्ग-३ व वर्ग-४ चे पुरेसे कर्मचारी न मिळाल्यामुळे या विभागात प्रभावीरित्या काम करता येत नसल्याची खंत खुद्द मंत्री महोदयांकडून व्यक्त होणे, परिणामी इतर मागासवर्ग बहुजन कल्याण समाजावर होणारा अन्याय दूर करण्याच्या दृष्टीने शासन स्तरावरुन होत असलेली अक्षम्य दिरंगाई व कमालीची चालढकल, उक्त पदे तातडीने भरुन ओबीसींना न्याय देण्याची निर्माण झालेली आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|

**पूरक मागणी क्रमांक: झेडजी-३**
**मुख्य लेखाशीर्ष: २२२५, अनुसूचीत जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण**
**बाब क्रमांक: ४८२, रूपये:- १,५८,००,००,०००/-**
**श्री. बळवंत वानखडे**

(२) ६२०२ १० यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेअंतर्गत अमरावती जिल्ह्यातील या योजनेसाठी पात्र लाभार्थ्यानी घरकुलासाठी अर्ज केलेला असणे, परंतु निधीअभावी वर्षोनोवर्षे या घरकुल लाभार्थ्यांना घरकुल मंजुरीसाठी प्रतीक्षा करावी लागत असणे, तसेच या योजनेअंतर्गत घरकुल मंजुरीची प्रक्रिया अतिशय किचकट असणे, सदर योजनेअंतर्गत घरकुल मंजुरीची प्रक्रिया सुलभ व सोपी करण्याची तसेच पात्र लाभार्थ्यांना निधी वितरीत करण्याची नितांत आवश्यकता असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

**पूरक मागणी क्रमांक: झेडजी-३**
**मुख्य लेखाशीर्ष: २२२५, अनुसूचीत जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण**
**बाब क्रमांक: ४८४, रूपये:- २,६९,००,००,०००/-**
**श्री. सुनिल केदार**

(३) ६१८८ १० ओबीसी प्रवर्गातील एमपीएससीची परीक्ष देणाऱ्या विघार्थ्यांना प्रशिक्षणादरम्यान येणाऱ्या खर्चात महाज्योती मार्फत अर्थसहाय केलेअसणे, यासाठी एमपीएससी प्रशिक्षण चाळणी परीक्षा घेतली जात असणे, त्यातील गुण आधारे हे अर्थसहाय केले जात असणे, यंदा ऑक्टोंबर २०२३ महिन्यात झालेल्या परीक्षेचा निकाल महाज्योती मार्फत नुकताच जाहीर करण्यात येणे, २०० गुणांसाठी घेण्यात आलेली परीक्षा ही राज्यातील १९ हजार १७३ विघार्थ्यांनी दिली असणे, या परीक्षेत एका विघार्थ्याला २०० गुणापैकी २२० गुण मिळाले असून अनेक विघार्थ्यांना २०० गुणा पैकी २०० पेक्षा जास्त गुण मिळालेले असणे, या निकालाची यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येताच विघार्थ्यामध्ये प्रचंड गोंधळ निर्माण होऊन संताप व्यक्त केलेले असणे, ही गंभीर बाब महाज्योतीच्या अधिकाऱ्यांच्या लक्षात येताच संकेतस्थळावरुन ती यादी हटविण्यात येणे, यापुर्वीही महाज्योतीच्या युपीएससी व एमपीएससी चाळणी परीक्षमध्ये असाच सावळा गोंधळ पुढे आल्याने या दोन्ही परीक्षा रदद करण्याची नामुश्की महाज्योतीच्या अधिकाऱ्यावर येणे, यंदाच्या परीक्षेत पूर्वीची कंपनी टाळून दुसऱ्या कंपनीला परीक्षा नियोजनाचे कंत्राट देण्यात येणे, यासाठी महाज्योतीमार्फतीने कंपनीला लाखो रूपये देण्यात येत असल्यामुळे अधिकाऱ्यांच्या संगणमताने पदाचा दुरउपयोग करून नियमबाहयरित्या कंपनीला कंत्राट दिल्यामूळेच हा सावळा गोंधळ निर्माण झालेला असणे, हा प्रकार म्हणजे होतकरू विघार्थ्यांवर अन्याय करणारा असुन लांगेबांधे असणाऱ्या विघार्थ्यांना पास करणारा असल्यामूळे विघार्थ्यांसह पालकांत पसरलेले

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी उपरोक्त गंभीर प्रकरणाची सखोल चौकशी करून संबधितावर कार्यवाही होणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना व उपाययोजना. |
| | | | **श्री. नानाभाऊ पटोले** |
| (४) | ६२१६ | १० | भंडारा जिल्ह्यात साकोली, लाखनी व लाखांदूर तालुक्यात ओबीसी विद्यार्थ्यां करीता शासकीय मुला/मुलींचे वस्तीगृह उपलब्ध नसणे, त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणे, महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था ('महाज्योती') चे प्रशिक्षण केंद्र, वंचित घटकातील विद्यार्थी, लघु उद्योजक, शेतकरी आणि महिलांना विकासाची दिशा दाखवणारे, मार्गदर्शन करणारे, समुपदेशन केंद्रे तालुका स्तरावर उपलब्ध नसणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: झेडजी-३** |
| | | | **मुख्य लेखाशीर्ष: २२२५, अनुसूचीत जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण** |
| | | | **बाब क्रमांक: ४९५, रूपये:- ६,४३,७७,००,०००/-** |
| | | | **श्री. बाळासाहेब थोरात** |
| (५) | ६१९७ | १०० | शिष्यवृत्ती न पोहचल्याने परदेशातील इतर मागासवर्गातील विद्यार्थी संकटात सापडणेमाहे ऑगस्ट, २०२३ मध्ये परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर झाल्यानंतर काही विद्यार्थ्यांचे परदेशात कॉलेजेस सुरु होऊन सदर विद्यार्थी परदेशात कॉलेजात दाखल होणे, परदेशात जाण्यासाठी विमानाच्या तिकिटाचे शुल्क, वसतिगृहाचे भाडे, कॉलेजचे शुल्क, विम्याचे शुल्क व दैनंदिन गरजांसाठीचे शुल्क देण्याचे सरकारकडून जाहीर होणे, एक महिन्याचा कालावधी उलटून राज्य सरकारकडून अद्याप एक रुपयाची शिष्यवृत्ती सुध्दा न मिळणे, कॉलेज सुरु होणार असल्याने बहुजन कल्याण विभागाकडे चौकशी केली असता काही दिवसात या विद्यार्थ्यांच्या खात्यावर शिष्यवृत्तीची रक्कम जमा होणार, तुर्तास स्वत:च्या खर्चाने परदेशात जाण्याचा सल्ला विभागाकडून मिळणे, परंतु सद्य:स्थितीत ज्या विद्यार्थ्यांचे कॉलेजेस सुरु झाली त्यांची पैसे नसल्यामुळे परक्या मुलखात अडचण होणे, परिणामी या विद्यार्थ्यांमध्ये शंकेचे व भीतीचे वातावरण निर्माण होऊन पालकांमध्ये निर्माण झालेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: झेडजी-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२२५, अनुसूचीत जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण**<br>**बाब क्रमांक: ४९६, रूपये:- ८,०००/-**<br>**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)** |
| (६) | ६२२६ | १० | अमरावती जिल्हयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेअंतर्गत अनुसुचित जातीच्या विद्यार्थ्यांना गुणवत्तेच्या आधारे ज्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतीगृहात प्रवेश मिळत नाही अशा विद्यार्थ्यांना रुम भाड्याने करुन राहणे, जेवण इत्यादी करीता प्रतिवर्षी रु. 51 हजार दोन टप्प्यामध्ये दिले जाते असणे, सन 2022-23 या वर्षात 3220 विद्यार्थ्यांकडून ज्यांना शासकीय वसतीगृहात प्रवेश मिळालेला नाही त्यांचे अर्ज प्राप्त झालेले असणे, परंतु या विद्यार्थ्यांचा झालेला खर्च रु. 16.64 कोटी अद्यापही मिळालेला नसणे, त्यामुळे विद्यार्थ्यांचे गरीब पालक वर्ग अत्यंत अडचणीत झालेले असल्याने करीता शासनाने स्वाधार योजनेतील विद्यार्थ्यांना झालेला खर्च रु. 16.64 कोटी निधी उपलब्ध करुन करण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**नागपूर,**
**दिनांक : ११ डिसेंबर, २०२३**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) इतर मागास बहुजन कल्याण विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर